Registered No. B. 15

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 14TH OCTOBER 1897.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट आणखी सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट आणखी सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे :—

१. या आक्टास, सन १८९७ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट (१८६१) सुधारण्याबाबद आक्ट असें ह्मणावें. *लहान सरनामा.*

२. सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट, कलम १, याचा विशेष ठराव रद्द केला असे. *सन १८६१ चा आक्ट १६, कलम १, याचा विशेष ठराव रद्द करणें.*

३. सदरहू आक्टाच्या २० व्या कलमानंतर खालील कलम जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :— *सन १८६१ चा आक्ट १६, याच्या २० व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.*

"२० अ. (१) स्थानिक सरकारास, स्थानिक सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन, आपल्या वहिवाटींतील मुलुखांमध्यें किंवा त्या मुलुखांच्या कोणत्याही भागामध्यें या आक्टाचीं कारणें व हेतु सिद्धीस नेण्यासाठीं कानू करण्याचा अधिकार आहे. *कानू करण्याचा अधिकार.*

(२) विशेषेंकरून व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) या आक्टाअन्वयें द्यावयाच्या परवान्यांचे नमुने, व ते ज्या शर्तींवर देतां येतील त्या शर्ती, व ते ज्या प्रसंगीं रद्द करतां येतील ते प्रसंग फर्माविण्याचा,

(ब) डांकेच्या गाड्यांची पाहणी करण्याबद्दल ठराव करण्याचा, आणि

(क) ज्या टप्प्यांला घोडे डांकेच्या गाड्यांस जुंफून नेतां येतील त्यांची संख्या व अंतर, आणि त्या घोड्यांचें हरणीस कसें असलें पाहिजे व ते कोणत्या रीतीनें जुंफले पाहिजेत तें, या गोष्टी ठरविण्याचा,

अधिकार आहे.

(३) या कलमाअन्वयें कोणताही कानू करतांना स्थानिक सरकारास, त्या कानूचें उल्लंघन झालें असतां पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल, असें फर्माविण्याचा अधिकार आहे."

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट (सन १८६१ चा १६) हा, १ ल्या कलमाच्या विशेष ठरावामुळें, ज्या गाड्यांचा वीस मैलांहून जास्त प्रवासाकरितां साधारणतः उपयोग करण्यांत येतो, त्यांसच फक्त लागू होतो. या इयत्तेमुळें गैरसोई होते असें आढळून आलें आहे, कारण ज्या डांकेच्या गाड्या कायद्याच्या नियमास पात्र असाव्या त्या पुष्कळ प्रसंगीं सदरहूपेक्षां कमी अंतरांवर फिरतात. सबब वर सांगितलेला विशेष ठराव, प्रस्तुत मसुद्याच्या २ ज्या कलमावरून, रद्द करण्याचें योजिलें आहे.

२. तसेंच, सदरहू आक्टांतील ठरावांच्या पुष्टीकरणार्थ कानू करतां येतील असा अधिकार त्यांत मुळींच दिलेला नाहीं, यामुळें त्याची अपूर्तता व्यवहारांत आढळून आली आहे. तपशिलाच्या बाबतींचें, उदाहरणार्थ ज्या टप्प्यांला घोडे परवाना असलेल्या गाड्यांस जुंफून नेतां येतील त्यांच्या अंतराचें, नियमन करण्याकरितां, आणि सामान्यतः, यासंबंधाचा कायदा अमलांत आणण्यामध्यें अमलदारांची समजूत होण्याकरितां पुरवणीच्या कानू करण्याची जरूरी अनुभवावरून दिसून आली आहे. सबब, या बाबतींत जरूर असणारा अधिकार, प्रस्तुत मसुद्याच्या ३ ऱ्या कलमावरून स्था[illegible] रास देण्याचें योजिलें आहे.

तारीख ३ माहे आगस्ट, सन १८९७.

जे. वुडवर्न.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.